नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०७/२०२६ (बुधवार )

## अवैधरित्या विनापरवाना Tramadol HCl कॅप्सूलचा साठा व विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद; १ आरोपी अटक ; ३ लाख ६३ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त ; नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**नागपूर ग्रामीण जिल्हयातील अंमली पदार्थविरोधी मोहिमेंतर्गत एनडीपीएस पथक आणि कन्हान पोलीस यांनी संयुक्तरित्या कारवाई करत कन्हान पोलीस स्टेशन हद्दीत कारवाई करून Tramadol HCl या (Psychotropic) औषधयुक्त कॅप्सूलचा अवैधरित्या विनापरवाना साठा करून त्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत एकूण ३,६३,०२० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २१/०७/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहीती दिली की, **शोराब जब्बार अन्सारी, वय ४५ वर्षे, रा. काली माता मंदिरासमोर, कामठी कॉलरी क्रमांक ३, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर हा आपल्या राहत्या घरी अवैधरित्या विनापरवाना Pyeevon Spas Plus या ब्रँडच्या Tramadol HCl असलेल्या कॅप्सूलचा साठा करून त्यांची अमली पदार्थ म्हणून विक्री करीत आहे** .सदर पथकाने वर नमुद माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन कन्हान पोलीसांसह संयुक्त कारवाई करत **औषध निरीक्षक यांच्यासह** घटनास्थळी छापा टाकला. पंचासमक्ष आरोपी **शोराब जब्बार अन्सारीच्या राहत्या घरी छापा टाकला. सदर झडतीदरम्यान आरोपीकडून Tramadol HCl असलेल्या Pyeevon Spas**

**Plus** या एकूण १५,८१४ कॅप्सूल (एकूण वजन ७.९०७ कि.ग्रॅ.किंमत १,५८,१४०/— रुपये, रोख रक्कम २९,३८०/— रुपये, २ मोबाईल हँडसेट व एक चारचाकी वाहन क्र एम एच ४३ एन ४८२५ असा एकूण ३,६३,०२०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध कन्हान पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायदयाअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.







# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ;रोख रक्कम,४ मोबाईल, १० दुचाकी वाहनासह ०४ लाख २० हजार ३८० रूपयाचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक २१/०७/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सत्रापुर येथील लेबर कॅम्प येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी सदर ठिकाणी सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे १) देवानंद शामराव कुरमतकर, वय २७ वर्ष, रा. मु. पो. बोरडा, ता. रामटेक २) निरज राकेश तिवारी, वय ३४ वर्ष, रा. वार्ड नं. ३, पटेल नगर, पिपरी कन्हान ३) मोहन महादेव शिवरकर, वय २९ वर्ष, रा. वार्ड नं. ३, गादा अजनी कामठी ४) कशीस कमल खडसे, वय २३ वर्ष, रा. आनंद नगर वार्ड नं. १, कन्हान ५) निहाल मोरेश्वर मेश्राम, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं. ९, नयागोदाम कामठी, जि. नागपूर ६) सारंग कार्तिक कुथे, वय ३२ वर्ष, रा. दुर्गा माता मंदीर चौक, पिपरी कन्हान हे जागीच ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. ०१ आरोपी घटनास्थळाहुन पळुन गेला. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि नगदी ८३५०/—रूपये, ०४ अॅन्डरॉईड मोबाईल, १० दुचाकी वाहने असा एकुण ४,२०,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## दिनांक २५/०७/२०२६ व दिनांक ३०/०७/२०२६ रोजी पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली आणि  श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदीर परीसर ''नो पार्कींग झोन'' म्हणुन घोषीत

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक २५/०७/२०२६ व दि. ३०/०७/२०२६ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंड्या आणि पालख्यांचे आगमन होत असते.

मौजा धापेवाडा हे श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान विदर्भाचे पंढरपूर म्हणुन ओळखले जात असुन दरवर्षी मोठया प्रमाणात भाविक दर्शनाकरिता येतात. मंदिरपरीसराचे ठिकाणी भाविक हे आपले स्वत:चे खाजगी  दुचाकी, चारचाकी वाहनाने दर्शनाकरिता येतात व वाहने रस्त्याचे दुतर्फा लावून दर्शनाकरिता निघून जातात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून वाहतुकीची कोंडी होवून भाविकांना दर्शना करिता अडचणी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. **त्यामुळे दिनांक २५/०७/२०२६ व दि. ३०/०७/२०२६ रोजी पर्यंत श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट**

**धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथील आषाढी एकादशी यात्रे निमित्य राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली व मंदीर परीसरात''नो पार्कींग झोन'' घोषीत करण्यात येत आहे. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली आणि मंदीर परीसरात स्वत:चे वाहन पार्क करू नये.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक २१/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू असा एकुण १३,३६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) मदन महादेवराव काळे, वय ६५ वर्ष, रा. दिग्रस (बु) २) सुरेश रामभाउजी नाठे, वय ५० वर्ष, रा. दिग्रस (बु) यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी साहेबराव शंकर मडके, वय ४१ वर्ष, रा. खैरी पंजाब, ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा येथे** महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी नामे प्रज्वल सिध्दार्थ पक्कीडे, रा. वार्ड क्र. ०५, पाटणसांवगी, ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, आरोपी १) दिपक रामचंद्र बारे, वय ४० वर्ष, रा. यशवंत बाबा झोपडपट्टी, ता. सावनेर २) दादाराव धनराज खराड, वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र ०२, पोस्टे च्या मागे सावनेर यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** एमआयडीसी बोरी येथे आरोपी अनवर ताराचंद खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. सालईधाबा, ता. हिंगणा, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महिला आरोपी हिचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २१६० मिली देशी दारू, ३९ लिटर मोहाफुल दारू, २०० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण १३,३६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने